साहित्य मैफल



# हमाम मे सब नंगे!

विश्लेषण

**अजय तिवारी**

**महिलांच्या सौंदर्याचा वापर करून हवे ते पदरात पाडून घेण्यावर राजकारणात भर दिला जात असल्याचे अलिकडे नव्याने अधोरेखीत झाले. ही पद्धत जुनी असली, तरी आता त्याचे लोण गावपातळीपर्यंत पोहोचले आहे. नियमानुसार न करता येणारी कामे 'हनी ट्रॅप'चा वापर करुन केली जात आहेत. विषकन्यांचा विळखा आता राजकारणी, अधिकारी आणि अन्य घटकांभोवती आवळला गेला आहे.**

गेल्या अनेक वर्षांमध्ये सुंदर महिलांचा वापर करून शत्रूराष्ट्रातील संरक्षण सिद्धतेची गोपनीय माहिती मिळवली जात आहे. फक्त पैसे कमवण्यासाठी महिला आपल्या शरीराचा उपयोग करू देतात, तेव्हा त्याला 'लेदर करन्सी' असे नाव असते; परंतु त्यापुढे जाऊन पैशापेक्षाही महिलांच्या सौंदर्याची भुरळ घालून कामे करून घेतली जातात, तेव्हा त्यात जास्त धोका असतो. महिलांसोबतच्या नाजूक प्रसंगाची छायाचित्रे, व्हिडीओ वापरून त्या माध्यमातून सातत्याने 'ब्लॅकमेलिंग' केले जाते. त्यातून पैसे मिळतातच; शिवाय अनेक बेकायदेशीर कामे करून घेतली जात असतात. अलिकडच्या काळात फोटोंचे मॉर्फिंग करून 'ब्लॅकमेल' करण्याचेही प्रकार वाढले आहेत.

त्यात तहसीलदार, उपनिबंधक, वरिष्ठ महसूल अधिकारी, पोलिस अधिकारी, बांधकाम खात्याचे अधिकारी अशा सर्वांचाच सहभाग असतो. अर्थात काही अधिकारी त्याला अपवाद आहेत. नाही असे नाही; परंतु मोहाच्या क्षणी मनावर नियंत्रण राखू न शकणारे अधिकारी 'लेदर करन्सी'बरोबरच 'ब्लॅकमेलिंग'चे ही बळी ठरतात. काहींनी तर आता नियमात न बसणारी कामे करून घेण्यासाठी सुंदर महिलांचा वापर करून घेण्याचा एक नवाच उद्योग सुरू केला आहे. शेकडो कोटी रुपयांच्या कामांचे कंत्राट मिळवण्यासाठी 'हनी ट्रॅप'चा उपयोग करून घेतला जात आहे. गेल्या काही वर्षांमध्ये सुंदर महिलांचा वापर करून अधिकारी, मंत्र्यांना वश करून हवे ते मिळवण्याचा प्रयत्न करण्याचे प्रकार घडले आहेत. त्यातून काही खुनाचे प्रकारही घडले आहेत.

राजकारणीच नव्हे तर, काही माध्यमे आणि माध्यमकर्मींनीही राजकीय नेत्यांना 'हनी ट्रॅप'मध्ये अडकवण्यासाठी महिलांचा वापर करून खिसे गरम करण्याचेही प्रकार घडले आहेत. एखाद्या वादविषयावर वृत्तमालिका लिहायच्या, त्यात राजकारण्यांची थेट नावे न देता नावाची केवळ ओळख जनतेला होईल, अशा प्रकारची वृत्ते द्यायची आणि पैसे कमवायचे, असा प्रकार आजही सुरू असतो. पैसे मिळेपर्यंत मालिका सुरू ठेवायच्या आणि पैसे मिळाल्यानंतर बंद करायच्या, अशी पद्धत असते. त्यासाठी माध्यमातील काही विकृत व्यक्ती महिलांना ठराविक रक्कम देतात. नंतर त्यांच्याकडून राजकारण्यांना 'हनी ट्रॅप' चे बळी बनवले जात असते. काही जिल्ह्यांमध्ये तर राजकारण्यांना महिला पुरवून त्यांच्याकडून हवी ती कामे करून घेणाऱ्या टोळ्या तयार झाल्या आहेत. त्यात सर्वपक्षीय राजकारण्यांचा सहभाग असतो. 'हमाम मे मे सब नंगे' अशी स्थिती असते. नाशिकमध्ये पुढे आलेला 'हनी ट्रॅप'चा ताजा प्रकार हे केवळ हिमनगाचे टोक आहे.

महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर चर्चेत असलेल्या 'हनी ट्रॅप' प्रकरणाचा गोपनीय तपास पुन्हा सुरू करण्यात आला आहे. राज्यातील तब्बल ७२ सनदी अधिकारी, राजकीय नेते तसेच आजी आणि माजी मंत्रीदेखील या जाळ्यामध्ये अडकल्याची तक्रार आहे. पोलिस उपनिरीक्षक, सहायक आयुक्त, पोलिस उपायुक्त, पोलिस उपनिरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक, सहायक पोलिस आयुक्त अशा मोठ्या दर्जाच्या अधिकाऱ्यांना 'हनी ट्रॅप'मध्ये अडकवून खंडणी मागणाऱ्या महिलेची गोपनीय पद्धतीने चौकशी सुरू झाली आहे. त्यामुळे या प्रकरणामुळे फक्त नाशिकच नाही, तर संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. नाशिकमधील एका अधिकाऱ्याला ठाण्यातील एका राजकीय पक्षाशी संबंधित असलेल्या महिलेच्या मदतीने नाशिकमधील एका राजकीय कनेक्शन असलेल्या हॉटेल व्यावसायिकाने या प्रकरणात अडकवल्याचे सांगितले जाते. या प्रकरणात 'मास्टर माईंड' कोण, याचा शोध घेतला जात आहे. राज्यातील अनेक वरिष्ठ सरकारी अधिकारी आणि आजी-माजी मंत्री 'हनी ट्रॅप'च्या जाळ्यात अडकल्याची माहिती समोर आल्यानंतर या षडयंत्राचा 'मास्टरमाईंड' हा नाशिकचाच असल्याचे समोर येत आहे. तो एका मोठ्या राजकीय पक्षाचा माजी पदाधिकारी आहे. हा प्रकार ज्या हॉटेलमध्ये घडला, त्या हॉटेलमधील कर्मचाऱ्यांची चौकशी करून त्यांचे जबाब नोंदवले जाणार आहेत. यातून प्रकरणातील अनेक धागेदोरे उलगडण्याची शक्यता आहे.

या प्रकरणाची वाच्यता होताच, राज्यातील अनेक अधिकाऱ्यांच्या नावाची चर्चा सुरु झाली आहेत. यात महसूल विभागातील सर्वाधिक अधिकारी गुंतल्याची माहिती आहे. त्यांनी महिलांच्या माध्यमातून अधिकाऱ्यांकडून पैसे उकळण्याचे किंवा हवे ते काम करून घेतले असण्याची शक्यता आहे. नाशिकमधील मुंबई नाका पोलिस ठाण्यात एका महिलेने आपले लैंगिक शोषण झाले असून आपल्याकडे संवेदनशील व्हिडीओ असल्याची तक्रार दाखल केल्यापासून 'व्हीआयपी हनीट्रॅप' चर्चेत आला. आता या प्रकरणात राजकारण सुरू झाले आहे. विधानसभेत आणि विधान परिषदेत त्यावर चर्चा झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी कोणाचीही तक्रार नसल्याचे सांगितले असले आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी खुशाल तिकीट लावून सीडी लावा असे आव्हान दिले असले, तरी काही आजी- माजी मंत्री, अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. जगातील अनेक देशांमध्ये सुंदर महिलांचा वापर शत्रूराष्ट्रातील लष्करी हालचाली तसेच त्या देशातील अन्य गोपनीय माहिती मिळवण्यासाठी केला जात असल्याची वारंवार चर्चा होत राहते. त्याच्या सुरस कहाण्याही ऐकवल्या जातात. आपल्याकडेही अलिकडेच संरक्षण आणि संशोधन संस्थेतील अधिकाऱ्यांना वश करण्यासाठी महिलांचा वापर करण्यात आल्याचे दिसून आले. रशियातील एका महिलेने, तर पन्नास वर्षांपूर्वी हनी ट्रॅप केले होते. भारतात लष्करी जवान, संरक्षण आणि संशोधन क्षेत्रातील अधिकाऱ्यांना वश करून त्यांच्याकडून गोपनीय माहिती मिळवण्याचे अनेक प्रकार घडले आहेत.





देशाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हे घातक आहे. या व्यापक हनी ट्रॅप मोहिमेत नोकरशहा आणि राजकारण्यांसह इतक्या मोठ्या संख्येने 'हाय-प्रोफाइल' व्यक्तींना कसे लक्ष्य केले गेले, गुप्तचर संस्थांना वेळेत शोधण्यात किंवा हस्तक्षेप करण्यात अपयश का आले आणि भविष्यात अशा गुन्ह्यांचा नाश करण्यासाठी कोणते उपाय राबवले जात आहेत या प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत. असेच काही महाराष्ट्राच्या राजकारणात घडत असल्याचा आरोप आहे. 'हनी ट्रॅप' करणारे लोक डिजिटल आणि वैयक्तिक संवादांद्वारे विश्वास मिळवतात आणि नंतर बलात्काराचे खोटे आरोप लावण्याची धमकी देऊन 'ब्लॅकमेल' करण्यासाठी गुप्तपणे आक्षेपार्ह फोटो आणि व्हिडीओ रेकॉर्डिंग करतात. हे संघटित गुन्हा करण्यासारखे आहे. या प्रकरणाच्या तपासात जनतेला पारदर्शकता हवी आहे.

सध्या महाराष्ट्रात वादळापूर्वीची शांतता आहे. काही संशयास्पद व्हिडीओंची शांतपणे चौकशी केली जात आहे. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर अनेक अधिकारी आणि नेत्यांचे भविष्य उद्ध्वस्त होईल, असा अंदाज वर्तवला जात आहे. हे एक सुनियोजित 'हनी ट्रॅप ऑपरेशन' होते की केवळ प्रभावशाली लोकांची रासलीला होती हे स्पष्ट झालेले नाही. हा व्हिडीओ इतका संवेदनशील असल्याचे म्हटले जाते की कोणताही अधिकारी या प्रकरणात पुढे येण्याचे धाडस करू शकत नाही. नाशिकमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह मुंबई आणि पुण्यातील अनेक वरिष्ठ अधिकारी या सापळ्यात अडकू शकतात. आतापर्यंत कोणीही अधिकृत पातळीवर कोणतेही मोठे विधान केलेले नसले, तरी ज्या पद्धतीने हे प्रकरण गुप्त ठेवले जात आहे, त्यामुळे संशय निर्माण होत आहे. ना पीडित उघडपणे पुढे येत आहे ना आरोपी. अशा परिस्थितीत, हा घोटाळा हळूहळू राजकीय स्फोटाचे रूप घेऊ शकतो. पाच वर्षांपूर्वी महाराष्ट्रात काही माध्यमांनी 'हनी ट्रॅप'च्या मालिका चालवून राजकीय नेत्यांना कसे 'ब्लॅकमेल' केले, याच्या सुरस कथा सांगितल्या गेल्या होत्या. राजकीय नेत्यांच्या नावाचे संकेत देत वृत्तमालिका चालवल्या गेल्या. नंतर त्यातून एक खून प्रकरण घडले. त्या वेळीही एका पोलिस अधिकाऱ्याला 'हनी ट्रॅप'मध्ये कसे अडकवले होते, हे ही पुढे आले होते. रेखा जरे खून प्रकरण आणि त्यातला काहींचा सहभाग आणि त्यांचे 'हनी ट्रॅप'शी असलेले अप्रत्यक्ष संबंध हा ही राज्यात चर्चेचा विषय झाला होता. आता ताजे प्रकरण अशा कोणत्याही घातक वळणावर जायचे नसेल तर पोलिस यंत्रणेने आणि गृह विभागाने वेळीच जागे होण्याची गरज आहे.

■ ■ ■

# स्फोटाच्या तपासाचीच पोलखोल

लक्षवेधी

**जनार्दन पाटील**

**मुंबईतील ११ जुलै २००६च्या बाँबस्फोटाचा निकाल १९ वर्षांनी लागला. 'जस्टीस डिलेड इज जस्टीस डिनाईड' असे म्हटले जात असते. आता आलेला निकाल हा या बाँबस्फोटात मृत्यमुखी पडलेल्या १८९ जणांवर जसा अन्याय करणारा आहे, तसाच इतकी वर्षे तुरुंगात खितपत पडलेल्यांवरही अन्याय करणारा आहे. राज्य सरकार, तपास यंत्रणा आणि वकिलांच्या कामावर या निकालाने गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.**

मुंबईतील पश्चिम उपनगरीय लोकलमध्ये झालेल्या साखळी बाँबस्फोटातील आरोपींच्या निर्दोष सुटकेवरून उच्च न्यायालयाच्या कामकाजाबद्दल कुतुहल वाटण्याची शक्यता आहे; परंतु न्यायालयाचा एकूण निकाल बारकाईने वाचला, तर त्यातून अनेक गंभीर प्रश्न उपस्थित होतात. हे गंभीर प्रश्न जसे तपास यंत्रणांमधील त्रुटींवर बोट ठेवतात, तसेच वकिलांच्या कार्यपद्धतीवरही शंका घेतात. मुंबई बाँबस्फोटाच्या तपासात विशेष पथक आणि दहशतवादविरोधी तपास पथकांमध्ये (एटीएस) दोन परस्परविरोधी मते होती. पाकिस्तानची दहशतवादी संघटना असलेल्या 'लष्कर-ए-तोयबा'शी संलग्न असलेल्या 'सिमी' या संघटनेने बाँबस्फोट घडवले की 'इंडियन मुजाहिदीन'ने घडवले, यावर वेगवेगळी मते होती. त्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाने आपल्या टिप्पण्यांमध्ये एटीएसच्या तपासावर कडक ताशेरे ओढले. आरोपींनी १९९३ च्या मुंबईच्या भीषण बॉम्बस्फोट प्रकरणात केला तसाच 'आरडीएक्स'चा वापर या लोकल गाड्यांच्या बॉम्बस्फोट प्रकरणातही करण्यात आला होता. पोलिस अधिकाऱ्यांकडे 'पोटा'अंतर्गत खटला चालवताना आरोपींनी दिलेल्या कबुलीजबाबांच्या आधारे मुंबई सत्र न्यायालयाने आरोपींना कठोर शिक्षा सुनावली होती. या कबुलीजबाबासह इतर काही नेमका पुरावाही होता. तो नाकारत मुंबई उच्च न्यायालयाने अशा पुराव्यावर विश्वास ठेवता येणार नाही, असे निरीक्षण निकालपत्राचा अभ्यास करताना नोंदवल्याचे दिसून आले. यावर आता सरकार सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल करणार आहे.

या साखळी रेल्वे बॉम्बस्फोटात अनेक निरपराध माणसे ठार झाली होती. त्यामुळे अशा रीतीने आरोपींची मुक्तता होताना यापूर्वी सत्र न्यायालयाने या खटल्यात विश्वास ठेवलेले पुरावेच आता उच्च न्यायालयाने विश्वासात न घेणे, ही गंभीर बाब आहे. यात कायद्याचे विश्लेषण करण्यात चूक झाली की तपासयंत्रणेने चुकीचा पुरावा गोळा केला होता, याबाबत योग्य सर्वोच्च न्यायालयात योग्य तो निकाल लागेल; परंतु उच्च न्यायालयाच्या निकालाचे अवलोकन करताना वकीलांच्या तसेच आणि तपास यंत्रणेच्या एकूण कार्यपद्धतीची करण्यात आलेली चिरफाड पाहता यापुढे तपास करताना तपास यंत्रणांना आणि युक्तिवाद करताना वकिलांना काय काळजी घ्यावी लागेल, याचा जणू धडाच घालून दिला गेला आहे. अख्ख्या देशाला हादरवून सोडणाऱ्या आणि १८९ निरपराध नागरिकांचे बळी घेणाऱ्या मुंबईतील साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता होणे हा जनसामान्यांसाठी धक्का आहे. या प्रकरणातील १२ आरोपींची निर्दोष मुक्तता करण्याचा निर्णय न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती आणि न्यायमूर्ती एस. चांडक यांच्या खंडपीठाने दिला. तपास सुरू असताना एका आरोपीचा मृत्यू झाला. २००६ मध्ये चर्चगेट ते बोरिवली स्थानकादरम्यान लोकलमध्ये ११ मिनिटांमध्ये पाच ठिकाणी स्फोट झाले. त्यामध्ये



१८९ प्रवाशांना जीव गमवावा लागला तर ८०० हून अधिक नागरिक जखमी झाले. या निकालामुळे सरकारला धक्का बसला असला, तरी आता सर्वोच्च न्यायालयात युक्तिवाद करताना मागची निरीक्षणे ध्यानी घ्यावी लागतील.

एखाद्या प्रकरणात आरोपींची निर्दोष मुक्तता होते, त्या वेळी सर्व कागदपत्र, पुराव्यांची पडताळणी होते. त्यामधून समोर येणारा पुरावा विश्वास वाढवणारा किंवा आरोपींचा दोष दाखवणारा असला पाहिजे, हे न्यायालय लक्षात घेते. त्यामुळे न्यायालय आरोपीची निर्दोष मुक्तता करत असेल, तर पोलिसांनी न्यायालयासमोर सादर केलेला किंवा ज्याची मांडणी करण्यात आली, तो पुरावा आरोपींना दोषी धरण्याइतपत सबळ नव्हता, असे आपल्याला म्हणावे लागते. अत्यंत संवेदनशील प्रकरणात निर्णय विरुद्ध गेला असेल, तर संबंधित यंत्रणा (पोलिस यंत्रणा व राज्य सरकार) कमी पडल्या आहेत, असेच म्हणावे लागेल. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन त्याप्रमाणे तपास व्हायला पाहिजे होता. जो काही पुरावा मिळाला, तो हुशारीने न्यायालयासमोर सादर करायला हवा होता; पण तसे झालेले दिसत नाही. यापुढे सर्वोच्च न्यायालयात उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणे हाच पर्याय आहे. या प्रकरणात सत्र न्यायालयाने १२ आरोपींना दोषी ठरवले होते. पाचजणांना मृत्यूदंड तर सातजणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली; मात्र उच्च न्यायालयामध्ये याच आरोपींची निर्दोष मुक्तता झाली. सत्र न्यायालय ते उच्च न्यायालय यादरम्यान पोलिस यंत्रणा नेमकी कुठे कमी पडली, हे शोधावे लागेल. सत्र न्यायालयाने दिलेल्या निवाड्याची संपूर्ण छाननी आणि पडताळणी उच्च न्यायलयाने केली असेल. त्यामुळे उच्च न्यायालयाला आरोपींना शिक्षा होण्याच्या दृष्टीने पुरावा पुरेसा नाही, असे वाटले असावे.

सत्र न्यायालयात चाललेला हा खटला आरोपींच्या 'पोटा' कायद्याच्या कबुलीजबाबावर आधारित होता; मात्र सत्र न्यायालयाचा हा निकाल मुंबई उच्च न्यायालयाने फिरवण्यामागे काही विसंगती अथवा तफावत असू शकते; मात्र मुंबई उच्च न्यायालयाच्या या निकालाविरोधात महाराष्ट्र शासनाला आता सर्वोच्च न्यायलयात दाखल केलेले अपील तयारीनिशी लढवावे लागेल. स्फोटानंतर महाराष्ट्र 'एटीएस'ने २००६ मध्ये काही आठवड्यानंतर कटाचा पर्दाफाश केल्याचा दावा केला आणि बारा जणांवर आरोप ठेवले. लोकल ट्रेन स्फोटांचा कट पाकिस्तानची गुप्तहेर संस्था 'आयएसआय'च्या आदेशावर रचला गेला होता आणि 'लष्कर-ए-तोयबा'ने 'सिमी'च्या मदतीने तो अंमलात आणला होता. हे बॉम्ब गोवंडीतील झोपडपट्टीत प्रेशर कुकरमध्ये तयार करण्यात आले आणि नंतर मुंबईतील लोकल ट्रेनमध्ये लावण्यात आले; मात्र, २००८ मध्ये मुंबई गुन्हे शाखेने 'इंडियन मुजाहिदीन' या कथित अतिरेकी संघटनेच्या सादिक शेख नावाच्या सदस्याला अटक केली आणि प्रकरणाला नवे वळण मिळाले. गुन्हे शाखेने त्या वेळी 'इंडियन मुजाहिदीन'नेच या स्फोटांची योजना आखून सादिकने इतरांसह मिळून बॉम्ब ठेवले होते, असा दावा केला होता. 'एटीएस'चे दावे फेटाळून लावत स्फोटात वापरण्यात आलेले बॉम्ब शिवडीतील एका सदनिकेत तयार करण्यात आले होते, असा दावा गुन्हे शाखेने केला. त्या वेळी गुन्हे शाखेने फैजल नावाच्या संशयिताला मिरा रोड येथून पकडले होते.

मुंबईत २००६ चा साखळी स्फोट घडवण्यासाठी ११ दहशतवादी पाकिस्तानातून आले होते. त्यातील एक २२ ऑगस्ट २००६ मध्ये मुंबईतील ॲन्टॉप हिल येथील चकमकीत ठार झाला. मोहम्मद अली याला दहशतवाद विरोधी पथकाने चकमकीत ठार केले. न्यायालयाने म्हटले आहे, की याद्वारे खटला सोडवण्याचा खोटा दावा केल्याने समाजाला फसवे आश्वासन मिळते. न्यायालयाने असेही निदर्शनास आणून दिले की आरोपींचे जबाब सारखेच होते. याव्यतिरिक्त उच्च न्यायालयाने ओळख परेड आणि साक्षीदारांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. काही साक्षीदारांनी घटनेच्या शंभर दिवसांनंतर आरोपींची ओळख पटवली. हे उच्च न्यायालयाने अविश्वसनीय मानले. कथित 'आरडीएक्स' आणि इतर स्फोटकांच्या जप्तीसाठी कोणतेही वैज्ञानिक पुरावे सादर केले गेले नाहीत. या निर्णयामुळे पुन्हा एकदा भारतीय फौजदारी कायद्याच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. मुंबईत बॉंबस्फोटात ठार झालेल्या व्यक्तींच्या कुटुबीयांना राज्य सरकारने अनेक आश्वासने दिली; परंतु ती पूर्ण झाली नाहीत. आर्थिक मदतीसह नोकऱ्यांच्या आश्वासनांना हरताळ फासला. त्यांच्यावर जसा अन्याय झाला, तसेच १८ वर्षे तुरुंगात राहिल्यानंतर निर्दोष सुटलेल्यांच्या कुटुंबीयांना मोठे मानसिक आणि आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे. दुसरीकडे, या हल्ल्यात आपल्या प्रियजनांना गमावणाऱ्या कुटुंबांनाही न्याय मिळाला नाही.



भारतीय राज्यघटनेच्या कलम १३६ नुसार कोणत्याही उच्च न्यायालयाच्या किंवा इतर न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात विशेष याचिका दाखल करता येते. तशी ती केली गेली आहे. अर्थात मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयामागील कारणमिमांसा तपासून निकाल दिला जाईल. यासाठी बराच वेळ लागू शकतो.

■ ■ ■

# फसलेल्या लोकशाहीची गोष्ट

**अलिकडे घडलेल्या अनेक घटना महाराष्ट्रातील बदलते राजकारण दाखवून देणाऱ्या आहेतच, पण कोणत्याही सुजाण नागरिकाला क्लेष देणाऱ्याही आहेत. राजकीय पक्षातील जबाबदार मंडळींची तसेच आमदारांची उर्मट वागणूक बघून महाराष्ट्राचे भविष्य कसे असेल, याचा अंदाज करता येतो. त्यामुळे शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारांचा, सुधारणांचा, संतविचारांचा महाराष्ट्र ही ओळख संपुष्टात येण्याची भीती दाटून येत आहे.**

पैलू

**राज असरोंडकर**,सामाजिक कार्यकर्ते

महाराष्ट्रातील काही ताज्या घटना अस्वस्थ करणाऱ्या आहेत. त्यातील विधीमंडळातील घटनेमध्ये दोन आमदारांच्या गुंडांनी एकमेकांवर हल्ले केले आणि आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडल्या. या आणि अशा घटना बदलत्या राजकारणाची दिशा दाखवतात आणि यातूनच राज्याचे भविष्य काय असणार, राज्य नेमके कोणत्या दिशेने जाणार हा विचार पुढे येतो आणि काळजी वाढते. शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारांचा महाराष्ट्र, पुरोगामी आणि सुधारणावादी विचारांचा महाराष्ट्र, संतपरंपरा असणारा महाराष्ट्र ही आपली ओळख वर्तमानामध्येच संपुष्टात येत असल्याचे जाणवू लागते.

महाराष्ट्राच्या राजकारणाचा पुढील प्रवास कसा असणार, हा विचारात घेण्याजोगा मुख्य मुद्दा आहे, कारण शेवटी राजकारणावरच सगळ्या गोष्टी अवलंबून असतात. सत्ताधारी पक्ष सरकार चालवताना ध्येयधोरणे आखतो. ती लोकाभिमुख असण्याची अपेक्षा असते. कारण त्यांचा संपूर्ण राज्यावर आणि स्वाभाविकपणे देशावरही दूरगामी परिणाम होत असतो. पण गेल्या काही वर्षांमधील राजकारण पाहता, विशेषत: कोणत्याही राजकीय हेतूने केलेली मांडणी न बघता सामाजिक भावनेतून तटस्थपणे पाहिले तरी २०१४ नंतर देशातील



राजकारण बदलत गेल्याचे दिसते. धर्माधारित राजकारण हा या राजकारणाचा केंद्रबदू झाला आहे. त्यानंतर राजकारणाला वेडीवाकडी वळणे लागून आता प्रवास इतका भरकटत गेला आहे की, आपण एका चिंताजनक स्थितीमध्ये येऊन पोहोचलो आहोत.

समाजात गुन्हेगारी घटना घडतात तेव्हा दाद मागण्यासाठी पोलीस यंत्रणा असते. त्यावर सरकारचे नियंत्रण असते. तेव्हा गुन्हेगारी आटोक्यात आणण्यासाठी आणि पोलिसांनी परिणामकारक काम करण्यासाठी किमान सरकार तरी गुन्हेगारी कामांमध्ये अडकलेले नसणे अपेक्षित आहे. मात्र, आज सभागृहामध्ये आमदार कसे वागतात, त्यांची भाषा काय असते, ते कोणत्या शब्दांचा प्रयोग करतात, बोलण्याचा टोन कसा असतो या बाबी बघितल्या तर लोकप्रतिनिधींमधील गुन्हेगारी वृत्ती आणि आपल्या कामाचे गांभीर्य हरवत चालल्याचे दिसून येते. त्यामुळेच त्यांच्यासाठी 'टपोरी' (हा शब्द कदाचित अयोग्य वाटेल) हा शब्द वापरण्याची अपरिहार्यता आता निर्माण झाली आहे. कारण टपोरी लोकांची एकमेकांच्या अंगावर धावून जातानाची भाषाच आमदार विधीमंडळाच्या अधिवेशनामध्ये वापरु लागले आहेत. लोकप्रतिनिधींच्या निवडीत भारतीय जनमानस पूर्वीपासून फसत आले आहे आणि अलिकडच्या काळात तर ते इतके संभ्रमावस्थेत आहे की, आपली निवड आपलेच भवितव्य अंधकारमय करणारी आहे, याचेही भान त्यांना राहिलेले नाही.

२०१४ मध्ये भारतीय संसदेतील आकडेवारीनुसार, एकूण ५४२ पैकी १९८ खासदार गुन्हेगारी पार्श्वभूमीचे होते आणि त्यातील ९८ खासदार एकट्या भारतीय जनता पार्टीचे होते. २०१४ नंतर हे आकडे कमी होणे अपेक्षित होते, कारण नरेंद्र मोदी यांची रंगवली गेलेली प्रतिमा वेगळी होती. पंतप्रधान झाल्यावर ते भारताचे रंगरुप बदलून टाकणार आहेत, ते भ्रष्टाचार संपवण्यास, नवे राजकारण घडवण्यास आले आहेत असा विचार तेव्हा पसरवण्यात आला होता. तेव्हाच्या निवडणूकपूर्व प्रचारसभांमध्ये नरेंद्र मोदींनीही गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या खासदारांच्या प्रश्नावर भाष्य केले होते. एके ठिकाणच्या सभेत ते म्हणाले होते की, माझी सत्ता आली तर गुन्हेगारी पार्श्वभूमीवर असणाऱ्या खासदारांची प्रतिज्ञापत्रे काढेन आणि सर्वोच्च न्यायालयाकडे देईन. यांचे काय ते करा, असे त्यांना सांगेन. पुढे सर्वोच्च न्यायालयाने त्यांना अपात्र ठरवले तर गुन्हेगारी पार्श्वभूमी असणारे कोणी राजकारणात येण्याचा, निवडणूक लढवण्याचा प्रयत्न करेल का? असा प्रश्न त्यांनी समुदायाला विचारला होता.

थोडक्यात, आपल्याला संसदेपासूनच साफसफाईची सुरूवात करायची आहे, असे मत मोदी यांनी वारंवार जनतेसमोर मांडले होते. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी प्रथम पंतप्रधानपदी आले तेव्हा एखाद्या गोष्टीला वेळ लागतो हे समजून घेतले तर सुरूवातीची पाच वर्षे आपण त्यांना माफ करु शकतो. पण २०१९ मध्ये गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या लोकप्रतिनिधींची संसदेतील संख्या वाढून २३३ झाली, ही बाब नजरेआड करुन चालणार नाही. या २३३ मध्ये एकट्या भारतीय जनता पक्षाचे ११६ खासदार होते आणि उरलेले अन्य पक्षांचे होते. यामध्ये हत्या, हत्येचे प्रयत्न, अपहरण, खंडणी, महिलांवरील अत्याचार, विनयभंग केल्याचा गुन्हा असणारे काही आणि अगदी बलात्काराचे गुन्हे असणारे तीन खासदार भारतीय संसदेत होते. पण याची ना भारतीय जनमानसाला लाज ना राजकीय पक्षांना वा ना सरकारमध्ये बसलेल्या कोणाला.. कोणाला ना खंत ना खेद... भारतीय राजकारणाची ही सद्यस्थिती आहे. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली गेली तेव्हा न्यायालयाने राजकीय पक्षांना सांगितले की, तुम्हाला गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारांना निवडणुकीचे तिकीट द्यायचे असेल तर अधिकृत वेबसाईटवर त्याची माहिती ठळकपणे प्रसारित केली पाहिजे. तसेच वर्तमानपत्र, वृत्तवाहिन्यांमध्ये ही बाब स्पष्ट सांगितली पाहिजे आणि तुम्ही त्यांनाच तिकीट का देताय, अन्य चांगले लोक नाहीत का, याचे स्पष्टीकरणही दिले पाहिजे.

या पार्श्वभूमीवर आपल्याकडील मोठ्या संख्येने असणाऱ्या वृत्तवाहिन्या, राजकीय पक्षांच्या वेबसाईट्स बघता १४० कोटींची लोकसंख्या असणाऱ्या देशात सर्वेक्षण करुन माहिती काढली तर अशी माहिती प्रसारित केल्याचे कितीजणांना माहिती आहे वा कितीजणांनी पाहिले आहे, हे शोधावे लागेल. प्रमुख वृत्तवाहिन्या इतक्या मोठ्या संख्येने असतानाही राजकीय पक्ष ही माहिती ठळकपणे प्रसारित करतात का, हा प्रश्न आहे. दुसरीकडे, अशा उमेदवारांची माहिती प्रसारित करणे अपरिहार्य असल्याने काही राजकीय पक्षांनी कोडगेपणाने माहिती प्रसारित केली; खेरीज आम्ही यांना तिकीट का दिले या प्रश्नाला 'ते लोकप्रिय आहेत' असे कारण दिले. असे कारण देण्यात केवळ भाजपाच नसून सगळ्याच राजकीय पक्षांनी आपल्या कृतीचे असे कोडगे समर्थन केले आहे. आता पक्षाचे तिकीट देण्यासाठी उमेदवार 'लोकप्रिय' असल्याचे कारण दिले जात असेल तर त्यांनी हा सगळा दोष लोकांवर, सर्वसामान्य जनतेवर ढकललेला दिसतो. पण लोकांना याची जाणीवच नाही. लोक अशा उमेदवारांना स्विकारत असतील, तर आम्ही काय करणार, या राजकीय पक्षांच्या कोडग्या प्रश्नातील मेख त्यांना समजतच नाही.

याचाच परिपाक म्हणजे आपल्याकडे ५० टक्क्यांपेक्षा जास्त खासदार गुन्हेगारी पार्श्वभूमीचे दिसतात. म्हणजेच त्यांना केवळ उमेदवारीच मिळत नाही तर ते निवडूनही येतात. तेव्हा विजयानंतर हेच पक्ष म्हणतात की, गुन्हेगारी पार्श्वभूमी असणारा उमेदवार देऊन आम्ही चूक केली असली तरी लोकांनी स्वमताने त्यांना निवडून दिले आहे, त्याचे काय...! हीच तर लोकशाही आहे. लोकांना तसे लोक आवडत असतील वा ते त्यांना उपयोगाचे वाटत असतील तर लोकशाहीत हे मान्य करावेच लागते. सध्याच्या राजकारणाने लोकशाहीचे हे चित्र निर्माण केले आहे. आजच्या तारखेला भारतीय संसद आणि भारतातल्या विविध राज्यांमधील आमदार अशा लोकप्रतिनिधींची एकूण आकडेवारी पाहिली तर या साडेचार हजार लोकांमधील दीड हजारांपेक्षा अधिक लोकप्रतिनिधी गुन्हेगारी पार्श्वभूमीचे दिसतात. खेरीज त्यातील ९० टक्क्यांपेक्षा अधिक करोडपती आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, समाजातील खालच्या वर्गापर्यंत सोयीसुविधा मिळाव्या यासाठी जनतेने त्यांच्यातील कार्यकर्तेच लोकप्रतिनिधी म्हणून निवडून द्यायला हवे. जेणेकरुन, ते या वर्गाच्या प्रश्नांना वाचा फोडतील आणि न्याय मिळवून देतील. परंतु, वरील आकडेवारी पाहता ८० टक्के जनतेला मोफत रेशन द्यावे लागत असताना त्याच देशातील ९० टक्के लोकप्रतिनिधी करोडपती दिसतात. याचा थोडक्यात अर्थ असा की, गोरगरीब लोकही आपला लोकप्रतिनिधी म्हणून करोडपती माणसालाच निवडतात. खरे सांगायचे तर इथेच लोकशाही फसली आहे.

याला आपण न्याय्य निवड म्हणू शकत नाही. लोकशाहीच्या नावाखाली ही जनतेची फसवणूक आहे. निवडणुका कशा प्रकारे होतात, प्रचंड पैसा कसा खर्च केला जातो, मते विकत घेतली जातात, मंडळे-संस्था-सोसायट्या कशा विकत घेतल्या जातात हे आता कोणापासूनही लपून राहिलेले नाही. आमिषे दाखवली जातात आणि समाजाला भ्रष्ट मानसिकतेमध्ये आणल्यानंतर हेच राजकीय लोक पुन्हा त्यांनाच दोष देतात. आजचे जनमानस या चक्रव्युहामध्ये अडकले आहे. आता ते योग्य आणि अयोग्य यामधून निवड करण्याच्या पलीकडे गेले आहे. धर्माधारित राजकारणाआडून अनैतिक आणि अयोग्य बाबींचेही उदात्तीकरण होत आहे. ही बाब देशाला विनाशाच्या दिशेने नेणारी आहे. म्हणूनच आता तरी समाजाने सजग होणे गरजेचे आहे.

**(लेखक 'कायद्याने वागा' या लोकचळवळीचे प्रणेते आहेत.)**

# सायबर संस्कार ही एक आवश्यक गरज


**एव्हाना आपण सर्वांनीच सायबरजगतात आणि त्या निमित्ताने एका नव्या विश्वात प्रवेश केला आहे. या जगतात आपल्याला अनुकूल आणि जगणे सूकर करणारी अनेक तंत्रे समाविष्ट आहेत. गेल्या दशकातील तंत्रज्ञान विकास व अंमलबजावणीच्या वेगापेक्षा पुढील दशकातील वेग अधिक दखलपात्र असेल. सर्वांना, विशेषतः एकविसाव्या शतकात जन्माला आलेल्या पिढीला इथे वावरताना जास्त सतर्क व जागरूक राहावे लागेल.**



तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

मनन करून, सर्वांगीण विचार करून कृती करतो तो मनुष्य. चांगला विचार आणि कृती होण्यासाठी संस्कारांची गरज असते. आजचे युग पूर्णपणे डिजिटल झालेय. एकविसाव्या शतकात संगणक आणि मोबाईल क्रांतीने जीवनपद्धतीचे सर्व संदर्भ बदलेले आहेत. नुकताच घडलेला एक प्रसंग सांगतो. कॉलेजमधला एक मित्र अनेक वर्षांनी विमानतळावर भेटला. तो बराच अस्वस्थ वाटत होता. त्याचे खरे कारण म्हणजे त्याचे मोबाईल डेटा आणि आउटगोइंग काही तास बंद होते आणि त्यामुळे त्याला सोशल मीडिया वापरता येत नव्हता. अशी अनेक उदाहरणे आपण बघतो. संगणक आणि इतर उपकरणे आपले जीवन सुसह्य करण्यासाठी निर्माण



केली आहेत. पण दुर्दैवाने अनेकजण त्याच्या अधीन झाले आहेत. दारू, सिगरेटसारखेच हे ही एक व्यसन आहे. आज प्रौढ वयात संगणक अथवा इंटरनेटशी संबंध आलेली पिढी आणि जन्मापासून संगणकीय युगातच वावरणारी म्हणजे साधारण २००० नंतर जन्मलेली मुले-मुली यांच्या इंटरनेटकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात मूलभूत फरक असणार आहेच.. इंटरनेट वापराच्या ३० टक्के एवढा वेळ सोशल नेटवर्किंग आणि ब्लॉग्जसाठी खर्च केला जातो, जो इ-मेलपेक्षा ही जास्त आहे. गेल्या काही वर्षांमध्ये लोकप्रिय सोशल नेटवर्किंग साइट वापरकर्त्यांच्या प्रमाणात जगभर लक्षणीय वाढ होत आहे. कुठल्याही गोष्टीचा अतिरेक कायम टाळला पाहिजे. अनेकदा वेळ नसल्याने पालक आणि बाल्यांचा संवाद कमी होत आहे. त्यामुळे संगणक, मोबाईल, टीव्ही ही उपकरणे मुलांच्या संवादाची साधने बनली आहेत. ८-१४ वयोगटातील बरेच विद्यार्थी याच्या आहारी जाऊन तेच आपले विश्व असल्याच्या भ्रमात वावरतात. त्यामुळे नैराश्य, दुभंगलेले व्यक्तिमत्व आदी समस्यांमुळे काहीजण आत्महत्येचा मार्गही स्वीकारत आहेत.

या पार्श्वभूमीवर प्रत्येक वस्तू, उपकरण हे 'स्मार्ट' असणे ही आज चैन नसून गरज बनत चालली आहे. सतत इंटरनेटचा वापर हे सुद्धा एक व्यसनच बनत आहे. कुठल्याही गोष्टीचा अतिरेक कायम टाळला पाहिजे. शेवटी आपण लक्षात घेतले पाहिजे की तंत्रज्ञान हे सुऱ्यासारखे असते. एखादे फळ कापण्यासाठी किंवा एखाद्याचा खून करण्यासाठीही ते वापरले जाऊ शकते. आहेत. इंटरनेटवर अनेक गुन्हेगार वावरत असतात, तसेच अतिरेकी मनोप्रवृत्तीचे लोकही वावरत असतात. मात्र हे लोक तुम्हाला फसवायचा प्रयत्न न करता आपलेसे करण्याचा प्रयत्न करत असल्याने या प्रकारच्या लोकांनी चालवलेल्या संकेतस्थळांची सफर करताना सावधपणा अंगी बाळगणे जरूरीचे असते. आजच्या काळात पालकांनी आपल्या पाल्यांना स्मार्टफोन द्यायच्या आधी तो कसा वापरावा याचे प्रशिक्षण देणे अत्यावश्यक आहे. तंत्राला वापरणारे मन, विचार हे त्याचा वापर ठरवते. अमेरिकेत अनेक वेळा शाळकरी मुलांवर खुनी हल्ले झालेत. ते आत्तापर्यंत कुठल्या तरी हाडामासाच्या विकृत खुनी व्यक्तीने केलेत. पण भविष्यात कदाचित स्वयंचलित वाहन किंवा यंत्रमानव असे गुन्हे करू शकेल. त्यावेळी खुनी कोण हे ठरवणे अवघड असेल.

माहिती-तंत्रज्ञानातील अभूतपूर्व क्रांतीने सारे जग जोडण्याची किमया केली खरी; परंतु त्याबरोबरच विघातक, विध्वंसक वृत्तींनाही कमी जोखीम पत्करून जास्त दुष्परिणाम घडवण्याची क्षमताही प्राप्त झाली. सायबर तंत्रज्ञानाद्वारे चालवली जाणारी अशी युद्धे आत्तापर्यंतच्या लढायांपेक्षा फार वेगळी असणार आहेत. कोणतीही प्रत्यक्ष सीमारेषा नसलेली आणि फार वेगाने पसरणारी.

यापुढे शाळा, महाविद्यालयांमध्येही संगणक किंवा स्मार्टफोनच्या दुष्परिणामांवर प्रबोधन होणे बंधनकारक व्हायला हवे. नागरिकशास्त्र या विषयातही याचा समावेश करायची हीच वेळ आहे. आधुनिक तंत्रज्ञान योग्य प्रकारे वापरणे म्हणजे सायबर संस्कार. सायबर संस्कार प्रशिक्षणात स्मार्टफोनचा वापर नेमका कसा करावा, सोशल मीडियावर माहिती पोस्ट करताना कोणती काळजी घ्यावी, सेल्फीचे व्यसन मर्यादित असावे; किंबहुना ते व्यसन बनूच नये, योग्य पध्दतीने चलतचित्रण करणे, सायबर गुन्हेगारी, स्वतःला सायबर सुरक्षित कसे ठेवायचे, सायबर कायदे कसे पाळायचे आणि सायबर गुन्हेगारी करणाऱ्यांना झालेल्या शिक्षा या महत्वाच्या बाबींची माहिती द्यायला हवी. हे प्रशिक्षण गंभिर्याने द्यायला, घ्यायला हवे. तरच त्याची परिणामकारकता जाणवेल आणि उपयुक्तता सिध्द होईल. पूर्वी फक्त भौतिक गोष्टींची सुरक्षा गणली जायची. आता सायबर सुरक्षा आणि सर्व संगणकीय भांडवलाची आणि माहितीची सुरक्षा ही एक अत्यावश्यक बाब झाली आहे. कुंपण, पहारेकरी, कड्या-कुलूप, तिजोरी, शिस्त हे सर्व पर्याय पारंपारिक भौतिक जगातील व्यवसायांसाठी ठीक आहेत, पण डिजिटल युगात ते कुचकामी ठरतात. त्यासाठी वेगळे सायबर नियम अत्यावश्यक आहेत

आगामी काही वर्षांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, विश्लेषण, यंत्रमानव (रोबोटिक्स), इंटरनेट ऑफ थिंग्स यासारख्या तंत्रज्ञानामुळे येत्या काळात जगाच्या भल्यासाठी अनेक क्रांतिकारी शोध लागतील. या संशोधनाचा वापर करुन नवीन उत्पादने बनू शकतील आणि बनतीलही. पण हेच सर्व तांत्रिक प्रवाह एखाद्या विकृत, गुन्हेगारी वृत्तीच्या व्यक्तीच्या हाती पडल्यास नाशही होऊ शकतो. यामुळेच एमआयटी, स्टॅनफर्ड, हार्वर्डसारख्या आंतरराष्ट्रीय विद्यापीठांमध्ये संगणक तंत्रज्ञांना आणि उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नैतिकता, नीतिमूल्य या मूलभूत विषयावर सक्तीचा अभ्यासक्रम विकसित होत आहे. त्यामुळे काय बरोबर आहे व काय चूक आहे हे समजून घेणे कसे गरजेचे आहे, हे नव्या पिढीला, तंत्रज्ञांना कळेल आणि या बाबी ते आचरणात, व्यवहारात आणतील, असा त्यांचा होरा आहे. हा प्रवाह काही वर्षांमध्येच भारतीय शिक्षणपद्धतीमध्येही अंतर्भूत होईल. अस्तित्वात असलेल्या मानवी नातेसंबंधांचा दर्जा आणि खुमारी वाढवण्यासाठी तंत्रज्ञान वापरा, पण सोशल नेटवर्किंग साइटवर जाऊन मित्र-मैत्रिणी शोधू नका, अशा ई-नातेसंबंधांचे मानवी व्यक्ती ऋणानुबंधात फार क्वचित रुपांतर होते, हे आता समजून घ्यावे आणि प्रसंगी समजावून सांगावे लागेल. त्यातून अनेकदा गुन्हेगारीचे प्रकार घडतात. सर्वच इंटरनेट वापरकर्ते सभ्य आणि सुसंस्कृत असतीलच असे नाही. इंटरनेटवर अनेक गुन्हेगार वावरत असतात तसे अतिरेकी मनोप्रवृत्तीचे लोकही वावरत असतात. मात्र हे लोक तुम्हाला फसवायचा प्रयत्न न करता आपलेसे करण्याचा प्रयत्न करत असल्याने या प्रकारच्या लोकांनी चालवलेल्या संकेतस्थळांची सफर करताना अंगी सावधपणा बाळगणे जरूरीचे असते

कुठलीही गोष्ट मर्यादित प्रमाणात मूल्य देते. तंत्रज्ञानाचेही असेच आहे. गरज असेल तरच मुलांनी ते वापरावे. वेळ जात नसेल तर मैदानी खेळ, कला, बाह्य क्रिया, योगा, फिरणे, संगीत असे अनेक पर्याय आहेत. इंटरनेट न वापरायचीही सवय झाली पाहिजे. माझा एक मित्र रविवारी इंटरनेट अजिबात वापरत नाही. या बाबतीतही स्वतःवर बंधन आणि शिस्त आवश्यक आहे. अनेकजण स्वत:वर ते घालून घेतात तर अनेकजण मुळातच संतुलन राखून सोशियल मीडिया, इंटरनेटचा वापर करतात. या ठिकाणी हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, माफक प्रमाणात आणि हवे असेल तेव्हाच आपण हे तंत्रज्ञान वापरले तर त्याचे अनेक फायदे आहेत, मात्र अनाठायी, उठता-बसता सायबरजगतात रमायची सवय लागली तर नजिकच्या काळातच या सवयीचे रुपांतर व्यसनामध्ये होऊ शकते आणि पाहता पाहता मुले या तंत्राच्या आहारी जाऊ शकतात. सायबरचोरीचे, या तंत्रामुळे निर्माण होणाऱ्या गुंत्याचे तोटे समजून घेतले आणि समजावून दिले तर भविष्यात या विश्वात वावरणे सोयीचे होईल, अन्यथा त्याचा बाऊ करणे किंवा त्यापासून दूर राहण्याचा मार्ग अनेकजण स्विकारताना दिसतील.



deepak@deepakshikarpur.com

**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

# योजना शेतकऱ्यांसाठी की शासनासाठी?

## कृषी विकासासाठीच्या वाटचालीत पंतप्रधान धन-धान्य कृषी योजना एक वास्तव....

प्रा. डॉ. जयश्री जाधव-कदम
९८८१९३८८५८

भारतातील ग्रामीण शेतकऱ्यांच्या विकासासाठी आणलेली योजना म्हणजे पंतप्रधान धन-धान्य कृषी योजना होय. २०२५ चे कृषी धोरण म्हणजे अभिसरणाद्वारे कृषी जिल्ह्यांचे रूपांतर.

१६ जुलै २०२५ रोजी मंजूर झालेल्या या योजनेत ६ वर्षांसाठी २४,००० कोटी रुपयांच्या वार्षिक खर्चासह १०० कमी कामगिरी करणाऱ्या कृषी जिल्ह्यांचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. उत्पादकता वाढवणे, पीक विविधीकरणाला प्रोत्साहन देणे, सिंचन आणि साठवणूक सुधारणे आणि कर्ज उपलब्धता सुनिश्चित करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

पीएमडीडीकेवायने ११ मंत्रालयांतर्गत ३६ योजनांचे विलीनीकरण करून धन-धान्य योजनेचा जन्म झालेला आहे. ही योजना येण्यापूर्वी जाहीर केलेल्या काही योजनाचा तपशील सन १९५०-५१ पासून सुरू झालेला पंचवार्षिक योजनांचा प्रवास १२ व्या पंचवार्षिक योजनेपर्यंत पोहोचला.

१२ व्या पंचवार्षिक योजनेचा कालखंड २०१२-२०१७ होता. या योजनेचा मुख्य उद्देश जलद, शाश्वत आणि अधिक समावेशक वाढ (Faster, Sustainable and More Inclusive Growth) साध्य करणे हा होता. देशाच्या सार्वत्रिक विकासासाठी पुढील १३ वी पंचवार्षिक योजना आखण्या ऐवजी पंचवार्षिक योजनेच्या वाटचालीला वेगळे वळण देऊन नियोजनाची दिशा १ जानेवारी २०१५ रोजी सरकारने नियोजन आयोग बरखास्त करून नीती आयोगाची स्थापना केली.

नीती आयोगाच्या माध्यमातून देशाच्या विकासाची उद्दिष्ट्ये निश्चित केली आहेत. पहिला टप्प्यात भारत सरकारने नीती आयोगाच्या माध्यमातून, कृषी विकासासाठी १५ वर्षांचा दृष्टिकोन, ७ वर्षांचे धोरण आणि ३ वर्षांचा कृती आराखडा विकसित केला.

या योजनेचे उद्दिष्ट शेतीचे आधुनिकीकरण करणे, शेतकऱ्यांचे उत्पन्न सुधारणे आणि अन्न सुरक्षा सुनिश्चित करणे आहे. यामध्ये उत्पादकता, पायाभूत सुविधा आणि शाश्वत पद्धतींवर लक्ष केंद्रित करणारा समग्र दृष्टिकोन समाविष्ट आहे.

९ ऑगस्ट २०१७ रोजी अमृत महोत्सव वर्ष Quit India Movement (क्विट इंडिया मुव्हमेंट) ला ७५ वर्षे पूर्ण झाली. या दिवसाचे औचित्य साधून मा. पंतप्रधानानी संकल्प ते सिद्धी या उपक्रमाद्वारे अर्थात पंचवार्षिक योजनेच्या शीर्षकामार्फत देशातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी एकाच वेळी संवाद साधला.

न्यू इंडिया - मंथन या विषयावर व्हिडिओ कॉन्फरन्सचे आयोजन करण्यात आले. पंतप्रधानांनी थेट जिल्हाधिकाऱ्यांशी संवाद साधून देशाच्या सर्वांगीण विकासाच्या योजना ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी कटिबद्ध राहण्याचे आवाहन केले.

देशाला प्रगतीची, सुधारणांची गोड रसाळ फळे पोहोचवण्यासाठी आरोग्य, शिक्षण, वीज आणि रस्ते या मूलभूत सुविधांपासून समाजातील एकही घटक वंचित राहणार नाही यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांना केले.

पुढे जानेवारी २०१८ मध्ये सुरू केलेल्या आकांक्षापूर्ण जिल्हा कार्यक्रमाचे (ADP) उद्दिष्ट देशभरातील ११२ सर्वात अविकसित जिल्ह्यांचे जलद आणि प्रभावीपणे रूपांतर करण्याचे होते. या कार्यक्रमात केंद्र आणि राज्यस्तरावरून नियोजन चालते. केंद्र, राज्यस्तरीय नोडल अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांचे सहकार्य आणि मासिक डेल्टा रँकिंगद्वारे जिल्ह्यांमधील स्पर्धा आयोजन हे सर्व एका जनचळवळीने चालवले जाते.

जिल्हा पातळीवर प्रगती जलदगतीने करण्यासाठी नीती आयोग संबंधित मंत्रालये आणि विविध विकास भागीदारांसोबत जवळून काम करते. सामाजिक-आर्थिक विषयांमध्ये सुधारणा घडवून आणणाऱ्या सर्वोत्तम पद्धती विकसित करण्यासाठी आणि त्यांचे अनुकरण करण्यासाठी जिल्ह्यांना प्रोत्साहित केले जाते.

आकांक्षापूर्ण जिल्हा कार्यक्रमाचा उद्देश मूलतः शाश्वत विकास उद्दिष्टांचे स्थानिकीकरण करणे आहे, ज्यामुळे देशाची प्रगती होते.सरकार आपल्या नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आणि सर्वांसाठी समावेशक विकास सुनिश्चित करण्यासाठी वचनबद्ध आहे. सबका साथ सबका विकास और सबका विश्वास. हा कार्यक्रम अर्थव्यवस्था सुधारण्यावर लक्ष केंद्रित करतो.

जर १ एप्रिल २०१७ ला तीन वर्षांच्या कृती योजना, १५ वर्षांचा दृष्टिकोन किंवा सात वर्षांच्या धोरणाची आखणी किंवा २०१७ ते २०२२ पर्यंत भारतातील समस्या दूर करणे म्हणजे गरीबीचे उच्चाटन, दहशतवादमुक्त भारत, सर्वधर्मसमभाव, भ्रष्टाचारमुक्त भारत इ. सर्वांपासून मुक्ती मिळविणे तसेच भारतासमोरील आव्हाने म्हणजे भ्रष्टाचार, गरिबी, निरक्षरता, सामाजिक तेढ नाहीसा करण्यासाठीच्या अनेक उपाययोजना करून स्वच्छ भारत, सुंदर भारत, शांत भारताचे स्वप्न आजही अधुरेच आहे.

सरकारने या आधीही असंख्य योजना नावे बदलून जनतेला गाजर दिले आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीताराम यांनी २०२५ च्या अर्थसंकल्पात केंद्रीय बजेट सादर करताना या योजनेबाबत घोषणा जाहीर केली होती. त्या घोषणाचे फलित म्हणजे धन-धान्य कृषी योजना ही एक परिवर्तनकारी उपक्रम असून ज्याचा उद्देश अनेक केंद्रीय योजनांना एकाच सुसंगत चौकटीत एकत्रित करून शेतकऱ्यांसाठी उत्पादकता शाश्वतता आणि आर्थिक व्यवहारता वाढवणे हाच मुख्य हेतू आहे.

या योजनेचा सविस्तर तपशील म्हणजे बुधवार दिनांक १६ जुलै २०२५ रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने पंतप्रधान धन-धान्य कृषी योजनेला सहा वर्षांसाठी मंजुरी दिली. या योजनेचा लाभ देशातील शंभर जिल्ह्यांमध्ये १ कोटी ७० लाख शेतकऱ्यांना होणार आहे.

देशातील अल्प कृषी उत्पादन असणाऱ्या १०० जिल्ह्यातील शेतकऱ्यांना विशेष सुविधा दिल्या जाणार आहेत. महत्वाचे म्हणजे शेती विषयी असलेल्या ३६ योजना एकत्र करून ही योजना अमलात आणली जात आहे. धन-धान्य कृषी योजनेसाठी असलेले तीन निकष आहे.

ज्या जिल्ह्यांमध्ये शेती उत्पादकता कमी, पीक घनता कमी आणि कर्ज वितरण कमी आहेत. योजनेसाठी असणाऱ्या निकषांच्या आधारे देशातील प्रत्येक जिल्ह्यातून किमान एक जिल्हा या योजनेसाठी सहभागी होईल. कामकाजासाठी राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर समित्यांची स्थापना केली जाणार आहे. ज्यावेळी समितीची निवड आणि प्रत्यक्ष कामकाज सुरू होईल त्यावेळी ग्रामीण शेतकऱ्यांना या योजनेचा खरा फायदा होणार.

शासनाने २०४७ साठीचे व्हिजन आणले त्यात एक शाश्वत आणि समावेशक परिसंस्था यात भविष्यातील शेतीमध्ये रोबोट, तापमान आणि आर्द्रता सेन्सर्स, हवाई प्रतिमा आणि जीपीएस तंत्रज्ञान यासारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल.

ही प्रगत उपकरणे आणि अचूक शेती आणि रोबोटिक प्रणाली शेती अधिक फायदेशीर, कार्यक्षम, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक बनवतील. आयसीएआर (भारतीय कृषी संशोधन परिषद) व्हिजन २०५० हे देशातील कृषी क्षेत्रासाठी एक धोरणात्मक दृष्टिकोन आहे, ज्यामध्ये २०५० पर्यंत नाविन्यपूर्ण, सर्वसमावेशक आणि शाश्वत कृषी विकासासाठी मार्गदर्शक तत्त्वे दिली आहेत.

शाश्वत कृषी विकासात नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण आणि पर्यावरणीय समतोल राखत, अन्नसुरक्षा सुनिश्चित करणे. नवीन तंत्रज्ञान आणि नविनता यामध्ये कृषी उत्पादन, प्रक्रिया आणि व्यवस्थापनात सुधारणा करण्यासाठी नवीन तंत्रज्ञान आणि पद्धतींचा अवलंब करणे.सर्वसमावेशक विकास यात लहान आणि सीमांत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे, त्यांची आर्थिक स्थिती सुधारणे आणि त्यांचे जीवनमान उंचावणे.

हवामान बदलाला तोंड देणे,पीक सुधारणा, मृदा आणि जल व्यवस्थापन, पिकांचे संरक्षण, पशुधन विकास इ. कृषी संशोधन आणि शिक्षणाद्वारे शाश्वत अन्न, पौष्टिकता, पर्यावरण आणि उपजीविका सुरक्षा प्राप्त करणे हे उद्दिष्ट आहे.

२०१६-२०३० पर्यंतचा भारतीय शेतीचा १५ वर्षांचा दृष्टिकोन हा पारंपारिक



पंचवार्षिक नियोजन मॉडेलपासून दूर जाऊन विकासाच्या व्यापक राष्ट्रीय धोरणाचा भाग होता.

या दृष्टिकोन दस्तऐवजाचे विशिष्ट तपशील सहज उपलब्ध नसले तरी, उत्पादकता वाढ, शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि शाश्वत पद्धती यासारख्या प्रमुख क्षेत्रांना संबोधित करण्याचा प्रमुख उद्देश होता. या काळात सुरू करण्यात आलेल्या अनेक उपक्रम आणि धोरणांनी, जसे की ई-नाम डिजिटल प्लॅटफॉर्म आणि पीएम-किसान योजना, या दृष्टिकोनाला हातभार लावला.

पुढील १५ वर्षांसाठी भारताच्या विकासासाठी व्हिजन डॉक्युमेंट आणि रोड मॅप तयार करण्यात आला. पण कृषी विकासासाठी १५ वर्षांचा दृष्टिकोन आणि कृती आराखडा किती विकसित झाला हे जनतेला समजण्याच्या आत असंख्य योजनाची सरमिसळ करून पुढील योजना सारे कागदावरच.. का फक्त इव्हेंट ....कागद आणि आपण भविष्याची वाट पाहू या....

# नागपंचमी..एक ऐतिहासिक चिंतन

वंश ही संकल्पना कशी आली? कशी जगभर पसरली असावी? याचे जर आपण शोध चिंतन केले तर त्यासाठी आपल्याला सर्वप्रथम प्रागैतिहासिक काळात मानव प्राणी हा भारतीय उपखंडात जंबुद्वीपात उगम पावला आहे ही गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे. जेथे स्थापन झालेल्या संस्कृती नुसार सर्वत्र गणराज्ये निर्माण केल्यागेलीत. ती समस्त गणराज्ये ही लोकशाही पद्धतीने चालविल्या जात. अर्थात त्यामुळे त्याकाळी ही आजच्या सारखेच विविध गण (आजच्या भाषेत पक्ष)असून त्यांच्यात देखील वैचारिक मतभेद असणारच. आणखीन महत्वाचे म्हणजे त्या काळी निर्भेळ लोकशाही अस्तीत्वात होती. त्यामुळेच जंबुद्विपासारख्या खंडप्राय प्रदेशात निरनिराळ्या विचारधारा असणे नैसर्गिक व स्वाभाविक आहे. त्यातूनच आपल्या विचारधारेच्या गटाला नावे देखील देण्यात आली असावीत.

हीच नावे पुढे जाऊन वंश म्हणून ओळखली गेली असावीत. जसे आजकाल लोक एकमेकाला हा कोंग्रेसी, हा भाजपवला,हा कम्युनिस्ट, हा द्रमुक वाला असे ओळखतात तसेच त्या प्रागैतिहासिक काळानुरुप, उदाहरणार्थ : हा आर्य , हा द्रविड, हा सूर्यवंशी (सौर पंचांग वापरणारा), हा चंद्रवंशी (किंवा सोमवंशी चांद्र पंचांग वापरणारा), असल्या प्रकारे ओळखत असावेत. याच ओळखींना कालौघाने वंश ही संज्ञा प्राप्त झाली असावी.

त्याचेच पुढील स्वरूप हे त्या त्या विचारधारेतील गटात जन्म घेऊन अलौकिक कर्म करून समाज मनावर आपले व्यक्तिमत्व कोरले जाईल अश्या प्रकारे जीवन व्यतीत केलेल्या महामानवांच्या नावाने, त्यांना आपला मूळ पुरुष मानून त्यांच्या पुढील पिढ्या ह्या त्या महान व्यक्तींच्या नावाने वंश म्हणून गणल्या जाऊ लागल्या असे आढळते. उदाहरणार्थ रघुवंश तथा कुरू वंश. परंतु हे भाग्य बहुतांशी राजघराण्याशी संबंधित लोकांच्याच वाट्याला आलेले असू शकते. सामान्यतः जनतेच्या दृष्टीने ज्या ज्या व्यक्तीने ज्या ज्या गुरुकुला तून आपले शिक्षण प्राप्त केले, त्या त्या गुरूंचे नाव आपल्या वंश म्हणून चालविण्याची प्रथा पडली असावी.

माझ्या ह्या चिंतनाने मला एकएक कोडे उलगडत असताना दिसते. ज्या मुळे बहुसंख्य हिंदू भारतीय व परदेशी लोकांच्या मनातील संभ्रम दूर होऊ शकेल. माझ्या चिंतनांनुसार तत्कालीन मातृसत्ताक कुटुंब पद्धतीने प्रत्येक मानवीय समुदायाने जसे, आदितीचे पुत्र आदित्यगण, ताम्राचे पुत्र ताम्र उर्फ गंधर्व गण, विश्वाचे पुत्र यक्ष गण, ईराचे पुत्र वृक्षप्रेमी गण, (ज्यांच्या गण समूहाचे चिंन्ह एक एक वृक्ष होते.) विनितेचे वैनतेय गण, (ज्यांच्या गण समूहाचे चिंन्ह एक एक पक्षी होते.) सुरसेचे सारमेय गण, (ज्यांच्या गण समूहाचे चिंन्ह एक एक चतुष्पाद प्राणी होते.) अशी नावे दिलेली असावीत.

असे चिंतन केल्यावर मला आढळले की रामायणातील वानर या नावाने संबोधली गेलेले मनुष्यगण हे मानवच असून केवळ त्यांचा ध्वज हा वानरांकित असून त्यांना त्याचा अभिमान होता. कारण आजही जर आपण दक्षिण भारतात बघितले तर तेथील बऱ्याच जमाती ह्या वानरा प्रमाणे सर सर नारळाच्या झाडावर चढतात व त्या करता त्यांच्या कमरे भोवती एक दोर लपेटलेला असतो जो वानराच्या शेपटी समान असतो.

ते लोक एका झाडावरून दुसऱ्या झाडावर ह्या दोराच्या सहाय्याने सहज उड्या घेऊ शकतात. पण आपल्या पूर्वापार मूर्ख कथेकरी, पुराणिकांनी, कथा, कादंबरी, सिनेमा, टीव्ही मालिका, वगैरे सोशल मीडियाने त्यांना चक्क वानरमुखी व शेपटीवाले दाखविले आहे. त्यामुळेच आपल्या स्वधर्मीय, तसेच पर धर्मीय लोकांपुढे अविश्वास निर्माण झाला आहे. म्हणुनच हनुमान, सुग्रीव , वाली, अंगद, आणि समस्त वानरसेना ही वानर मुखी व शेपटीवाले दाखविले आहे. पण मुळातच ही दाक्षिणात्य जमात माझ्या मते त्या काळी अत्यंत पुढारलेल्या तांत्रिक व वैज्ञानिक गोष्टींनी संपूर्ण असावी. त्यांना वैयक्तिक पॅरा ग्लाईडिंगची कला म्हणा किंवा तंत्रज्ञान अवगत असावे. म्हणुनच त्यांच्यातला सर्वोत्कृष्ट पॅरा ग्लाईडिंग करणारा तो श्रीहनुमान असावा. ज्याने एका उड्डाणात भारत ते श्रीलंका अंतर पार केले असावे.

त्याच प्रमाणे उपरिनिर्दिष्ट विवेचनानुसार कद्रुचे पुत्र काद्र झनागगण, यांस पूर्व गोलार्ध, (आजचा तिबेट, मंगोलिया, चीन, जपान दक्षिण आशिया खंड)- अपऱ्या नाकाची ठेंगणी मंडळी. यांचे नंतरचे काव्य, ग्रंथ, वर्णनीय नाव म्हणजे नाग गण असावे.

या नागगणाच्या विविध गटांनी आपापल्या गटांचे ध्वज चिन्ह नाग या सरपटणाऱ्या सर्पाच्या विविध प्रजातींचे ठेवून त्यांच्या गटांचे सम्राट त्यांच्या नावाने जसे १. नागराजा अनंत, २. (शेष) नागराजा वासुकी, ३. नागराजा तक्षक, ४. नागराजा कर्कोटक, ५. नागराजा ऐरावत असे ठेऊन विष, विषप्रयोग व विश्प्योर्गावरील औषधी याचे ज्ञान यात श्रेष्ठता प्राप्त केलेली असून त्या प्रकारे आपले वर्चस्व संपूर्ण भारतखंडात प्राप्त केलेले असू शकते.

जसे ह्या विषाने सम्पृक्त शराच्या / बाणाच्या स्वरुपात एक नागास्त्र म्हणून वापरले. नागपंचमीचा संबंध नागह्व या सरपटणाऱ्या सापाशी नसून भारतात नाग हे ध्वजचिन्ह असणारे उपरिनिर्देशित पाच पराक्रमी नाग वंशीय राजे होवून गेलेत, त्यांच्याशी आहे.

महाभारत युद्धानंतर संपूर्ण जंबुद्वीपत बहुतांशी क्षत्रिय राज्यवंशीय राजकुळे पुरुष योद्धे विरहित झालेली होती. त्यामुळे भारतवर्षभूमीच्या सीमेवरील नाग वंशीय राजकुलांनी मुख्य भारतभूमीवर आपापला साम्राज्य प्रसार केला.

माझ्या वाचनात आलेल्या इतिहासानुसार ह्या पाच ही नाग वंशीय राजांची स्वतंत्र राज्ये होती. यामध्ये नागराजा अनंत हा सर्वात मोठा. जम्मू-काश्मीर मधील अनंतनाग हे शहर त्यांच्या स्मृतीची साक्ष पटवून देते. त्यानंतर दुसरा नागराजा वासुकी नागराजा हा कैलास मानसरोवरा पासून उत्तर प्रदेश क्षेत्राचा प्रमुख होता.

तिसरा नागराजा तक्षक यानेच जगप्रसिद्ध तक्षशिला विश्वविद्यापीठ स्थापन केले. येथेच पुढे प्लेटो, अँरीस्टॉटल सारखे तत्वज्ञ शिकून गेलेत असे ऐकले आहे . चवथा नागराजा कर्कोटकाचे रावी नदीच्या शेजारील प्रदेशात राज्य होते. पाचवा नागराजा ऐरावत (पिंगाला) भंडारा प्रांत आजही पिन्गालाई एरीया म्हणून ओळखला जातो. ह्या पाच ही नागराजांच्या गणराज्याच्या सीमा ऐकमेकांच्या राज्याला लागून होत्या.

हे पाच नागराजे मृत्यू पावल्या नंतर, त्यांच्या जन्म स्मृतिप्रित्यर्थ नागवंशीय लोकांनी नागपंचमी दिन दरवर्षी साजरा करीत असत. कालांतराने अर्धवट अकलेच्या लेखणीने नागराजाचे रुपांतर जमिनिवर सरपटणाऱ्या सापात करुन टाकले. त्याचाच परिणाम म्हणून 'नाग-नरसोबा' आणि काही पोथ्या प्रसिद्ध झाल्या आणि हा दिवस फक्त सरपटणाऱ्या सापांची पंचमी म्हणून ओळखली जावू लागली आणि वास्तविक नाग वंशीय राजे लोकांची पंचमी लुप्त झाली.

आज नागाला दुध पाजणे, त्याची पूजा करणे एवढाच नागपंचमीचा अर्थ उरला. समाज आजही घराच्या भिंतीवर पाच नाग काढणे विसरलेला नाही. हे पाच नाग म्हणजेच आपले पराक्रमी पूर्वज पाच नागराजे होते, ते जमिनीवर सरपटणारे सर्प नव्हेत. आज जरी नागपंचमी ही सरपटणाऱ्या नागाची म्हणून प्रसिध्द असली तरी त्याबाबतची ऐतिहासिक वास्तविकता वेगळीच आहे. अभ्यासू मंडळींनी यावर अजून खोलवर अभ्यास करून वास्तविक सत्य पुढे आणणे आवश्यक वाटते.

■ ■ ■



डॉ. अविनाश प. परांजपे
वानाडोंगरी, हिंगणारोड ,
नागपूर .

# स्कूल बस सुरक्षेशी तडजोड नकोच




गेल्या आठवड्यात, बंगळुरूच्या मगडी येथील एसबीएस स्कूलमध्ये दुसऱ्या इयत्तेत शिकणारा एल. रजत (७) त्याची १० वर्षांची बहीण दुशिता हिच्यासोबत स्कूल बसमध्ये घरी परतत होता.

त्याचे पालक, लोकेश आणि राधा हे दोघेही रोजंदारीवर काम करणारे आहेत. साधारणपणे, स्कूल बसमध्ये ३० विद्यार्थी असतात. मुलांची काळजी घेण्यासाठी एका महिला अटेंडंटचीही नियुक्ती केली जाते. बस रजत आणि दुशिता यांच्या घराजवळून निघत होत असल्याने, ते सर्वात आधी चढतात. परतीच्या प्रवासात, भावंडे सर्वात शेवटी उतरतात.

शुक्रवारी संध्याकाळी, सर्व मुले बसमधून उतरल्यानंतर, महिला अटेंडंटदेखील रजत आणि दुशिता यांच्या आधी एक थांबा खाली उतरली. ३५ वर्षीय बसचालक आर. विनोद यांनी बस पुढे नेली आणि रजत आणि दुशिता गेटजवळ बसले होते. बसचा दरवाजा व्यवस्थित लॉक नसल्याने ते उघडले.

विनोद यांनी रजतला दरवाजा बंद करण्यास सांगितले. रजत दरवाजाजवळ जाताच तो बसमधून खाली पडला आणि बसचा मागचा टायर त्याच्या अंगावरून गेला. विनोदने त्याला ताबडतोब जवळच्या खासगी रुग्णालयात नेले, परंतु रजतला वाचवता आले नाही. पोलिसांनी विनोदला सदोष मनुष्यवधाच्या आरोपाखाली अटक केली.

सहसा, अपघातात मृत्यू झाल्यास, आरोपीला निष्काळजीपणामुळे मृत्यू घडवून आणल्याच्या आरोपाखाली अटक केली जाते आणि पोलिस स्टेशनमधूनच त्याला जामीन मिळतो. परंतु जेव्हा सदोष मनुष्यवधाच्या आरोपाखाली अटक केली जाते तेव्हा पोलिसांना आरोपीला संबंधित न्यायालयात हजर करावे लागते, जिथून आरोपीला सहसा न्यायालयीन कोठडीत सोपवले जाते.

एका तपास अधिकाऱ्याने सांगितले की, दार व्यवस्थित बंद आहे याची खात्री करणे विनोदची जबाबदारी होती. पण त्याने तपासणी केली नाही. दुसरी चूक म्हणजे त्याने रजतला धावत्या बसमध्ये दरवाजा बंद करण्यास सांगितले. विनोदला जिल्हा कारागृहात पाठवण्यात आले आहे.

**तर आता उर्वरित मुलांनी काय करावे?**

१. त्यांनी नेहमी समोरच्या दिशेने बसावे. २. जर बसमध्ये सीटबेल्ट असेल तर ती पूर्णपणे थांबल्यावरच ते उघडावे. मुलांना ही सवय लावावी. ३. मुलांनी धावत्या बसमध्ये फिरू नये. ४. कुणीही त्यांना सांगितले तरी त्यांनी दरवाजा उघडू नये. ५. त्यांनी त्यांचे हात किंवा डोके खिडकीतून बाहेर काढू नये. ६. त्यांनी ओरडू नये आणि चालकाचे लक्ष विचलित करू नये. ७. जर बसची स्थिती खराब असेल तर पालकांना किंवा शिक्षकांना कळवावे.

शाळांनी काय करावे?

कोणताही कर्मचारी मुलाला स्कूल बसमध्ये एकटे सोडू शकत नाही आणि कोणताही कर्मचारी मुलांना रजतला सांगितल्याप्रमाणे कोणतेही काम करण्यास सांगू शकत नाही.

**सरकारने काय करावे?**

दुबईमध्ये, जर एखादी स्कूल बस मुलाला सोडण्यासाठी थांबली तर कोणतेही वाहन कोणत्याही बाजूने तिला ओव्हरटेक करू शकत नाही. सर्व ड्रायव्हर स्कूल बस चालत असतानाच ओव्हरटेक करू शकतात. कारण जेव्हा एखादा मुलगा बसमधून उतरतो तेव्हा तो धोका न ओळखता कोणत्याही दिशेने पळून जाण्याची शक्यता जास्त असते.

युरोपमध्ये, जेव्हा एखादी स्कूल बस लाल दिवे लावते आणि थांबण्यासाठी सिग्नल देते तेव्हा दोन्ही दिशांनी येणारी वाहतूक पूर्णपणे थांबावी लागते. संपूर्ण युरोपमध्ये हा एक सार्वत्रिक नियम आहे. जर थांबलेली स्कूल बस लाल दिवे लावत असेल, तर ती ओलांडण्यास सक्त मनाई आहे. बसमध्ये चढणाऱ्या किंवा उतरणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी हे केले जाते.

सरकारने असा नियमदेखील बनवावा की ठराविक किलोमीटर चालवल्यानंतर बसचे टायर बदलावे लागतील. फंडा असा आहे की, पालक म्हणून, तुम्ही बेजबाबदार कंत्राटी चालकावर विश्वास ठेवून तुमच्या मुलाचा जीव धोक्यात घालू नये. तुम्हाला स्वतःच याची काळजी घ्यावी लागेल.

## आला श्रावण श्रावण..!

आला श्रावण श्रावण
हरीत लेणं घेऊन
सळसळ करे धाण
बळीराजा गातो गाणं..

आला श्रावण श्रावण
नभ येती भरून
क्षणात पडे उनं
इंद्रधनुष्य दिसे छानं..

आला श्रावण श्रावण
घेऊन पंचमीचा सण
ललना झोक्यात रममाण
आनंदा येई उधाण..

आला श्रावण श्रावण
व्रत कैवल्याचे अधिष्ठान
हर हर च्या गर्जनेनं
शिवालये जाती दुमदुमुन..

आला श्रावण श्रावण
झुळझुळ वाहे जीवन
कोकीळेच्या स्वरांनं
भाऊ मन होई रे प्रसन्न..!

**सौ. मंगला अशोक सारडा**
**शिवाजी नगर, मेहकर .**
**जि. बुलढाणा.**

■ ■ ■

## माझी आई.....

रोज पहाटे शाळेत जाताना घामाने डबडबलेली
मात्र प्रसन्न चेहऱ्याने आम्हाला निरोप देणारी
माझी आई मी पाहिली आहे....
स्वतःचं कधी काहीच न आवरता
माझी वेणी-फणी आणि डबा नित्यनेमाने आवरणारी
माझी आई मी पाहिली आहे...
कामावर जाताना वेळेत ट्रेन पकडण्यासाठी
मुंबईच्या गर्दीतून वाट काढत धावणारी
माझी आई मी पाहिली आहे...

शिक्षिका म्हणून स्वतःची कर्तव्य पार पाडत असताना
आपल्या मुलींना सर्व व्यवस्थित मिळतंय ना
याची खात्री करणारी माझी आई मी पाहिली आहे...
स्वतःसाठी कधी काहीच खरेदी न करणारी
मात्र आमची सारी हौस मौज पुरवणारी
लडिवाळ माझी आई मी पाहिली आहे....
परीक्षेत अडणारा साधा प्रश्न असो वा
जीवनाच्या परीक्षेत पडणारा अवघड प्रश्न
सोपा करून सोडवणारी आई मी पाहिली आहे...
माज्या मुली कुठेही दुर्बल ठरू नयेत यासाठी
अभ्यासच काय, घरकाम आणि स्वयंपाकातही
आम्हाला सुगरण करणारी आई मी पाहिली आहे...
आजही माझ्या डोळ्यातील पाणी
जिच्या डोळ्यातील झोप हिरावून घेते
अशी पराकोटीची माया करणारी
माझी आई मी पाहिली आहे....
एकच मागणे देवाकडे
माझी आई मला अशीच
आयुष्यभर पाहता येऊ दे

■ पूनम जाधव- हांडे, पुणे.

# ग्लॅम वर्ल्ड

## 'सैयारा'ची हवा

रिलीजच्या पहिल्या तीन दिवसांमध्येच बॉक्स ऑफिसवर कमाईची सुनामी आणून 'सैय्यारा'ने खळबळ उडवून दिली असून ही घोडदौड अजूनही सुरू आहे. या रोमँटिक थ्रिलरबद्दल चाहत्यांमध्ये असणारी प्रचंड क्रेझच त्याच्या यशाचे युएसपी बनले आहे.



थोडक्यात 'सैय्यारा'चे पडसाद सर्वत्र ऐकू येत असून यशाची पंचसूत्री सध्या चांगलीच चर्चेत आहे.

एक तर याचा शुद्ध आशय प्रभावी असल्याचे समीक्षक आणि प्रेक्षकांचे म्हणणे आहे. मुख्य म्हणजे त्याचे दिग्दर्शक मोहित सुरीची कोणाशीही स्पर्धा दिसत नाही. यापूर्वी 'आशिकी २', 'एक व्हिलन रिटर्न्स' आणि 'मलंग' सारख्या अनेक रोमँटिक चित्रपटांद्वारे त्यांनी चाहत्यांची मने जिंकणारे चित्रपट दिले आहेत आणि अशाच खास शैलीमध्ये 'सैय्यारा' ही तयार केला आहे. त्याचमुळेच क्रिस कपूर आणि वाणीची प्रेमकथा प्रेक्षकांना आवडत आहे.

'सैय्यारा' च्या यशात श्रवणीय संगीतानेही मोठी भूमिका बजावली आहे. अरिजीत सिंग, जुबिन नौटियाल, फहीम अब्दुल्ला आणि विशाल मिश्रा यांसारख्या गायकांनी गाण्यांना वेगळी लय दिली असून संगीतकार मिथुन, तनिष्क बागची आणि अरसनल निजामी यांनी संगीत अधिक सुश्राव्य केले आहे. इर्शाद कामिल, राज शेखर आणि ऋषभ कांत यांची गाणी यूट्यूब आणि जिओ सावन सारख्या ऑनलाइन संगीत प्लॅटफॉर्मवर नंबर-१ वर ट्रेंड करत आहेत.

'सैय्यारा' च्या यशाचे आणखी एक मोठे कारण त्यांचे 'नो प्रमोशन' धोरणही मानले जाते. यशराज फिल्म्सने कोणत्याही प्रकारच्या प्रमोशन आणि मीडिया मुलाखतींमध्ये नवोदित कलाकार अहान पांडे आणि अनित पड्डा यांचा समावेश केला नाही. खरेतर दिग्दर्शकाने दोघांनाही अचानक पडद्यावर आणून एक मोठा जुगारच खेळला होता. पण या प्रयोगामुळेच कथा आणि पात्रांबाबतची उत्सुकता कायम राहिली आणि मोठे यश मिळाले. 'सैयारा' अतिशय कमी बजेटमध्ये बनवण्यात आला. अवघ्या ४०-४५ कोटींचे त्याचे बजेट होते. मात्र त्याने पहिल्या तीन दिवसांमध्येच ८० कोटींहून अधिक कलेक्शन करून हवा निर्माण केली. आता ती कोणत्या दिशेला वाहते आणि चित्रपट ब्लॉकबस्टर ठरतो का, हे लवकरच कळेल.

## चर्चा तर होणारच

अभिनेत्री तारा सुतारियाने नुकतेच इंस्टाग्रामवर काही फोटो शेअर केले असून त्यात ती एपी ढिल्लनसोबत दिसत आहे. तारा आणि ढिल्लनचे फोटो खूप रोमँटिक असले तरी सोशल मीडिया वापरकर्त्यांचे लक्ष मात्र दुसऱ्याच एका गोष्टीमुळे वेधले गेले आहे.

सध्या तारा सुतारिया तिच्या पंजाबी सेन्सेशन एपी ढिल्लन आणि श्रेया घोषाल यांच्यासोबतच्या 'थोडी सी दारू' या नवीन म्युझिक व्हिडिओद्वारे सोशल मीडियावर धुमाकूळ घालत आहे. हा व्हिडिओ दृश्यांमुळे तसेच ताराच्या ढिल्लनसोबतच्या केमिस्ट्रीमुळे चर्चेत आला आहे. परंतु खऱ्या अर्थाने ती कथित बॉयफ्रेंड वीर पहारियासोबतच्या एका इन्स्टाग्राम



चॅटमुळेही चर्चेत आली होती. तारा आणि वीर यांच्याबद्दलच्या अफवा तिच्या आणि आधार जैनच्या ब्रेकअपनंतर पसरू लागल्या. दोघे एकाच रेस्टॉरंटमधून डिनर डेटवर बाहेर पडताना दिसले तेव्हा या शंकेला अधिकच बळकटी मिळाली. या महिन्याच्या सुरुवातीला, दोघांनी एका फॅशन इव्हेंटमध्ये शोस्टॉपर्स म्हणून रॅम्पवर वॉक केला आणि इटलीच्या कॅप्री येथे एकत्र सुट्टी घालवल्याची बातमी आली. त्यानंतर इंस्टाग्रामवर या दोघांचे फोटो पोस्ट केल्याने डेटिंगच्या अफवांना आणखी बळकटी मिळाली. चाहत्यांना त्यांच्यातील नात्याबद्दल जाणून घेण्याची इच्छा आहे. 'थोडी सी दारू' च्या आधी तारा श्रेया घोषालच्या 'प्यार आता है' या गाण्यात ईशान खट्टरसोबत स्क्रीन शेअर करताना दिसली होती. अभिनयाबद्दल बोलायचे झाले तर ती शेवटची अभिषेक बॅनर्जी आणि राजपाल यादव यांच्यासोबत 'अपूर्वा' मध्ये दिसली होती.

## 'दृश्यम ३' मागील दृश्य

'दृश्यम' हा अजय देवगणच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम चित्रपटांपैकी एक आहे. आतापर्यंत 'दृश्यम-१' आणि 'दृश्यम २' प्रदर्शित झाले असून दोन्ही बॉक्स ऑफिसवर सुपरहिट ठरले आहेत. असे असताना अलीकडेच, 'सन ऑफ सरदार-२' चे प्रमोशन करताना अजय देवगणने 'दृश्यम-३' घेऊन येणार असल्याचे सांगितले होते. तथापि, या भागाचे शूटिंग सुरू करण्यापूर्वीच अजयला कायदेशीर कारवाईची धमकी मिळाली आहे.

अजय देवगणला धमकी देणारा दुसरा तिसरा कोणी नसून 'दृश्यम'चा दिग्दर्शक आहे, परंतु तो हिंदी नाही तर मल्याळम आहे. अजयचे 'दृश्यम' आणि 'दृश्यम २' हे दोन्ही मोहनलालच्या चित्रपटाचे हिंदी रिमेक असल्याचे आपण जाणतो. हे



दोन्ही भाग दक्षिणेतही याच शीर्षकाने प्रदर्शित झाले आहेत. असे असताना 'दृश्यम' या मल्याळम चित्रपटाचे दिग्दर्शन जितू जोसेफ यांनी आता अजयला इशारा दिला आहे. त्यांनी सांगितले की, 'दृश्यम ३' च्या मल्याळम आणि हिंदी अशा दोन्ही आवृत्त्यांचे शूटिंग एकाच वेळी सुरू करण्यासाठी चर्चा झाली आहे. परंतु अद्याप त्याबाबत कोणताही अधिकृत निर्णय घेतला गेलेला नाही. दुसरीकडे लवकरच हिंदी आवृत्तीचे शूटिंग सुरू करण्याचा निर्णय समोर आला आहे. म्हणूनच असे केल्यास अजय देवगणला कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागू शकते, असा मी संकेत दिला तेव्हा त्याने एक पाऊल मागे घेतले असे जितू जोसेफ यांनी स्पष्ट केले. मल्याळम चित्रपटाच्या पटकथेवर अद्याप काम सुरू आहे. अशा परिस्थितीत, या चित्रपटाचे निर्मिती ऑक्टोबरमध्येच सुरू होऊ शकते, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. खेरीज जितूने असेही सांगितले की, त्याने नुकताच 'दृश्यम-३' या मल्याळम चित्रपटाचा क्लायमॅक्स लिहिला आहे.

या चित्रपटाबाबत त्याच्यावर बराच काळ दबाव होता. आता मोहनलालचा 'दृश्यम-३' ऑक्टोबरमध्ये शूटिंगला जाईल, तेव्हा अजय देवगणच्या हिंदी आवृत्तीचे शूटिंग होण्यास जास्त वेळ लागेल हे स्पष्ट आहे. अशा परिस्थितीत, प्रेक्षक पुढील वर्षी म्हणजे २०२६ मध्येच हा चित्रपट पाहू शकतील अशी शक्यता आहे.

## 'अवतार' चा नवा अवतार

हॉलिवूड दिग्दर्शक जेम्स कॅमेरॉन यांच्या 'अवतार' ची जगभरात क्रेझ आहे. हा चित्रपट जगातील सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांपैकी एक आहे. २००९ मध्ये पहिला भाग प्रदर्शित झाला तेव्हा त्याला चाहत्यांकडून प्रचंड प्रेम मिळाले.



या विज्ञानावर आधारित चित्रपटाचे यश पाहून निर्मात्यांनी २०२२ मध्ये दुसरा भाग 'अवतार: द वे ऑफ वॉटर' आणला. त्यानेही जगभरात २.३२ अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त कमाई केली. या यशानंतर आता निर्माते तिसऱ्या भागासाठी सज्ज आहेत. 'अवतार: फायर अँड ॲश' असे नाव असणारा तिसरा भाग या वर्षीच्या शेवटी मोठ्या पडद्यावर येईल. निर्मात्यांनी तसे पोस्टरही रिलीज केले असल्यामुळे चाहत्यांचा उत्साह वाढला आहे.

निर्मात्यांनी तिसऱ्या भागाचे अधिकृत पोस्टर शेअर करताना त्यातील 'वरंग' हा नवीन खलनायकही जगासमोर आणला आहे. पोस्टरमध्ये खलनायकाचा अपूर्ण चेहरा दिसत असून पाठीमागे ठिणग्या आणि आग दिसत आहे. लवकरच चित्रपटाचा एक्सक्लुझिव्ह ट्रेलर रिलीज होणारा असल्याची घोषणाही उत्साहवर्धक म्हणावी लागेल.

बहुचर्चित पोस्टर पाहिल्यानंतर एका वापरकर्त्याने सोशल मीडियावर लिहिले की, 'वरंग' या चित्रपटाचा सर्वात प्रतिष्ठित अवतार आहे. त्याच्या डोळ्यातील आगीप्रमाणेच, ही घोषणा ऐकून मलाही रडू येत आहे. दुसऱ्या वापरकर्त्याने लिहिले आहे की, अवतारचे विश्व अधिक गडद होत आहे. आणखी एका वापरकर्त्याने 'द किंग इज रिटर्निंग' असे म्हणत चित्रपटाला शुभेच्छा दिल्या आहेत.

'अवतार: फायर अँड ॲश'च्या रिलीज तारखेबद्दल बोलायचे तर तो या वर्षी ख्रिसमसच्या निमित्ताने १९ डिसेंबर २०२५ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होईल. तेव्हा प्रतीक्षा करु या.

## जामीन फेटाळला, सलमानला दिलासा

सलमान खानचे चाहते सतत त्याच्या सुरक्षिततेसाठी प्रार्थना करत असतात. १४ एप्रिल २०२४ रोजी सकाळी साडेपाच वाजता त्याच्या घराबाहेर दोन अज्ञात लोकांनी गोळीबार केला आणि चाहते चांगलेच घाबरले. पोलिसांनी या प्रकरणात एका व्यक्तीला अटक केली. तो माणूस लॉरेन्स बिश्नोई टोळीशी संबंधित असल्याचे सांगण्यात आले. आता नवीन अपडेट अशी की, पोलिसांनी अटक केलेल्या या आरोपीचे सगळे युक्तिवाद फेटाळून लावले असून त्याला जामीन देण्यासही नकार दिला आहे.

महाराष्ट्र संघटित गुन्हे नियंत्रण कायद्याचे (मकोका) न्यायाधीश महेश जाधव यांनी आरोपी सोनू चंदर उर्फ सोनूकुमार बिश्नोई याचा जामीन अर्ज फेटाळला आहे. यावेळी विशेष न्यायालयाने म्हटले, पुराव्यांवरून हे स्पष्ट होते की, चंदरने इतर आरोपींसह आणि बिश्नोई टोळीचा प्रमुख म्हणून सलमान खानच्या हत्येचा कट रचला होता. कायद्याच्या संबंधित तरतुदींनुसार संघटित गुन्हेगारी टोळीचे सदस्यत्व एखाद्या व्यक्तीला मकोका अंतर्गत जबाबदार ठरवते.



विशेष न्यायालयाने पुढे म्हटले आहे की नोंदींनुसार, राजस्थान आणि नवी दिल्लीमध्ये या संघटित गुन्हेगारी टोळीविरुद्ध आधीच आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सलमान खान प्रकरणांमध्ये टोळीचे नेते लॉरेन्स बिश्नोई, अनमोल बिश्नोई आणि इतर सहकाऱ्यांनी कट रचला आणि गुन्हा केला.

सलमान खानच्या आगामी प्रकल्पांबद्दल बोलायचे तर 'सिकंदर'नंतर तो आता 'बॅटल ऑफ गलवान'च्या शूटिंगमध्ये व्यस्त आहे. यात चित्रांगदा सिंग त्याच्यासोबत मुख्य भूमिकेत दिसणार आहे. सलमान खान अपूर्व लाखियाच्या या चित्रपटासाठी लेह लडाखमध्ये काही महत्त्वपूर्ण दृश्यांचे चित्रीकरण करणार आहे.



## 'डॉन' चे दिग्दर्शक काळाच्या पडद्याआड

अलीकडेच दिग्दर्शक चंद्रा बोरोट यांचे निधन झाल्याची दुखद बातमी आपण ऐकली. १९७८ मध्ये प्रदर्शित झालेल्या अमिताभ बच्चन यांच्या सुपरहिट 'डॉन'चे तसेच काही बंगाली चित्रपटांचे दिग्दर्शक आता या जगात नाहीत. वयाच्या ८६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. या ज्येष्ठ दिग्दर्शकाच्या निधनाने चित्रपटसृष्टीचे मोठे नुकसान झाले असून सर्वत्र शोककळा पसरली आहे.

दिग्दर्शक चंद्रा बारोट बऱ्याच काळापासून आजारी होते. उपचारासाठी त्यांना मुंबईतील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र तेथेच त्यांची प्राणज्योत मालवली. चंद्रा बारोट यांच्या पत्नी दीपा बारोट यांनी सांगितले की, ते बऱ्याच काळापासून पल्मोनरी फायब्रोसिसने ग्रस्त होते. सात वर्षांपासून त्यांना ही समस्या भेडसावत होती. अमिताभ बच्चन त्यांनीही चंद्रा बारोट यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहत दु:ख व्यक्त केले. पल्मोनरी फायब्रोसिस हा फुफ्फुसांचा अतिशय गंभीर आजार आहे. त्यात श्वास घेणे खूप कठीण होते. फुफ्फुसे नीट काम करणे थांबवतात आणि रुग्णाची प्रकृती खूप वाईट होते.

## श्रेयसचा जीव भांड्यात





'पुष्पा' या सुपरहिट चित्रपटात अल्लू अर्जुनचे हिंदी डबिंग करण्यासाठी प्रसिद्ध असणारा श्रेयस तळपदे सध्या एका कायदेशीर प्रकरणात अडकला आहे. त्याच्यावर मल्टी-लेव्हल मार्केटिंग स्कीमद्वारे फसवणूक आणि विश्वासघाताचा आरोप आहे. हा खटला हरियाणाच्या सोनीपत जिल्ह्याशी संबंधित आहे. तथापि, सर्वोच्च न्यायालयाने सध्या मोठा दिलासा दिला असून त्याच्या अटकेला स्थगिती दिली आहे.

न्यायाधीश बी.व्ही. नागरत्न आणि न्यायमूर्ती के.व्ही. विश्वनाथन यांच्या सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने या प्रकरणाची सुनावणी करताना श्रेयस तळपदेला अंतरिम संरक्षण दिले आहे. यासोबतच न्यायालयाने हरियाणा पोलिसांसह इतर संबंधित पक्षांना नोटीस बजावून या प्रकरणात उत्तर मागितले आहे.

हे संपूर्ण प्रकरण इंदूर (मध्य प्रदेश) येथे नोंदणीकृत 'ह्युमन वेल्फेअर क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड' नावाच्या कंपनीशी संबंधित आहे. ही कंपनी चिट फंड योजना चालवत होती, ज्यामध्ये गुंतवणुकीवर सहा वर्षांत दुप्पट रक्कम देण्याचा दावा करण्यात आला होता.

जनतेचा विश्वास जिंकण्यासाठी कंपनीने अभिनेता श्रेयस तळपदे आणि आलोक नाथ यांना ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्त केले. या प्रसिद्धीच्या आधारे कंपनीने लाखो लोकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केली. या योजनेअंतर्गत ४५ गुंतवणूकदारांकडून ९.१२ कोटी रुपये वसूल करण्यात आले शिवाय योजनेचा प्रचार करण्यासाठी सामान्य लोकांना एजंट बनवण्यात आले आणि त्यांना 'व्यवस्थापक' सारखी पदे देऊन नवीन गुंतवणूकदार जोडण्यास प्रोत्साहित करण्यात आले. योजनेच्या नावाखाली कोट्यवधी रुपये वसूल झाल्यानंतर मात्र नोव्हेंबर २०२४ मध्ये कंपनीची सर्व कार्यालये अचानक बंद करण्यात आली. त्यानंतर फसवणूक उघडकीस आली आणि विविध जिल्ह्यांमध्ये या प्रकरणात एफआयआर दाखल करण्यात आले. या प्रकरणात श्रेयस तळपदेसह एकूण १३ जणांची नावे आहेत. एफआयआरनुसार, कंपनीने केवळ खोटी आश्वासने दिली नाहीत तर सार्वजनिक व्यक्तींचा वापर करून लोकांना दिशाभूलही केल्याचे नोंदवण्यात आले. श्रेयस तळपदे आणि आलोक नाथ यांचे चेहरे ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून पुढे करून लोकांना कंपनीवर विश्वास ठेवण्यास भाग पाडले गेल्याचेही समोर आले. मात्र आता अटकेला स्थगिती मिळाल्याने श्रेयसवरील संकट टळले आहे.

## तेव्हाची अफवा, आत्ताचे स्पष्टीकरण



बॉलिवूडपासून दाक्षिणात्य चित्रसृष्टीपर्यंत नाव कमावणारी शिल्पा शिरोडकर अनेकदा चर्चेत असते. १९९५ मध्ये आलेल्या 'रघुवीर' च्या शूटिंगदरम्यान अभिनेत्रीचा मृत्यू झाल्याची अफवा पसरली होती. या अफवेमुळे तिचे कुटुंब खूपच नाराज झाले होते. आता शिल्पाने पहिल्यांदाच या अफवेबद्दल मौन सोडले आहे.

तेव्हा शूटिंगदरम्यान तिच्यावर गोळ्या घालून हत्या झाल्याची अफवा पसरली होती. तथापि, निर्मात्यांनी नंतर हा चित्रपटाचा प्रमोशनल इव्हेंट असल्याचे सांगितले होते. अलीकडेच याबद्दल बोलताना शिल्पा म्हणाली, तेव्हा मी कुल्लू मनालीमध्ये होते. अफवा तर पसरली पण आमच्यापर्यंत आली नव्हती. मात्र वडिलांना हे समजले तेव्हा ते सतत हॉटेलमध्ये फोन करण्याचा प्रयत्न करत होते. मी सुनील शेट्टीसोबत शूटिंग करत होते. तेव्हा शूटिंग पाहणाऱ्या काही लोकांनाही आश्चर्य वाटत होते की ही खरोखरच शिल्पा आहे की दुसरे कोणी कारण त्यांच्यापर्यंत ही अफवा आली होती. मी खोलीत परतले तेव्हा सुमारे २०-२५ जणांचे फोन येऊन गेल्याचे सांगण्यात आले. माझे पालक काळजीत होते कारण वर्तमानपत्रात हेडलाइन होती की, शिल्पा शिरोडकरची गोळ्या घालून हत्या करण्यात आली आहे. तथापि, नंतर दिग्दर्शकाने ही चित्रपटाची प्रमोशनल स्ट्रॅटेजी असल्याचे सांगितले तेव्हा ते शांत झाले.

अभिनेत्री पुढे म्हणाली, त्यावेळी या प्रमोशन ॲक्टिव्हिटीबाबत कोणाला काहीही सांगण्यात आले नव्हते वा माझी कोणी परवानगीही घेतली नव्हती. त्यामुळे या अफवेमुळे प्रचंड मनस्ताप सोसावा लागला. पण त्याचा चांगला परिणाम दिसल्याने मी जास्त रागावले नाही. शिल्पा शिरोडकर लवकरच 'जटाधारा' या चित्रपटात दिसणार आहे. या पार्श्वभूमीवर तिने केलेल्या या खुलाशाकडे पाहिले जात आहे.